Sl


**विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, मुंबई**
जवाहर बालभवन, तळमजला नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड, मुंबई ४००० ००४
दुरध्वनी क्र. ०२२/२३६३००८१/८६ ईमेल- dydemumbai@yahoo.com


क्र.शिउसं/माध्य-२/ माअ /२०२२/ 11570 दिनांक:- 16 NOV 2022

प्रति,

मा.अध्यक्ष,
तक्रार निवारण समिती,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ सेक्टर १६, वाशी नवी मुंबई.

**विषय:- श्री जितेंद्र कदम व इतर २४ प्रतिनिधी यांचे रिट याचिका क्र (L) १५३४९/२०२१मधील मा. उच्च न्यायालय यांचे दिनांक ०४/०८/२०२१ च्या अनुषंगाने समितीस सादर निवेदन.**

**संदर्भ:-** १. तक्रार निवारण समितीचा अहवाल जा.क्र.मुंविमं/त.नि.स/आदेश/२०२२/६६४२ दि ०४/०७/२०२२.
२. या कार्यालयाचे पत्र क्र शिउसं/माध्य-२/माअ/२०२२/८९८७ दि.२९/०८/२०२२
३. लेखाधिकारी (शिक्षण ) कार्यालय बृहन्मुंबई दक्षिण विभाग यांचे पत्र क्र. लेअ/दवि/२०२२/७३ दि २३/०९/२०२२

उपरोक्त संदर्भिय आदेशान्वये तक्रार निवारण समितीने आय.ई.एस. मॉडर्न इंग्लीश स्कुल दादर या शाळेच्या विरोधातआलेल्या तक्रारीची सुनावणी घेवून निर्णय दिलेला होता.

सदर सुनावणी मध्ये तक्रार निवारण समितीने कोविड या असाधारण परिस्थितीत शैक्षणिक फी हा आर्थिक लाभाचा मार्ग प्रतिवादी मार्फत बनविल्याचा निवेदन कर्ता यांच्या आरोपावर या कार्यालयाच्या स्तरावर लेखाधिकारी व इतर अधिकारी यांच्या समावेशासह विशेष पथक गठित करुन माध्यमिक शिक्षण संहिता विभाग ४ मधील नियम ८३ अन्वये शाळेचे फी संबधी रेकॅार्डस, रजिस्टर इ बाबतची तपासणी करून निवेदनकर्ता यांच्या आरोपात तथ्य दिसत असल्यास नियमान्वये प्रतिवादी संस्था/शाळा यांचे विरुदध प्रचलित कायदयानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यासाठी आदेशित करण्यात आले होते, त्याप्रमाणे विशेष पथक गठित करण्यात आले होते.

माध्यमिक शिक्षण संहिता विभाग ४ मधील नियम ८३ अन्वये शाळेचे फी संबधी रेकॅार्डस, रजिस्टर इ बाबतची तपासणी केली आहे.

सदर पथकाच्या तपासणी अहवालातील गोषवा-यानुसार एकूण जमा रकमेच्या तुलनेत वेतन व भत्ते यावरील सन २०१८-१९ ते २०२०-२१ या वर्षातील सरासरी खर्च ५४ टक्के ते ६२ टक्के दरम्यान असून वेतनेतर बाबीवरील आवश्यक खर्च, भाडे व कर १४.३५ टक्के ते १५.१४ टक्के, इतर प्रशासकीय खर्च ११.०६ टक्के ते १९.९४ टक्के इतका आहे. शिल्लक रक्कम ४.१९ टक्के ते १२.२० टक्के दरम्यान असून ती वाजवी असल्याचे नमूद केले आहे.

सदयस्थितीमध्ये शाळेतील शिक्षक /शिक्षकेतर कर्मचा-यांना सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन अदा करण्यात येत आहे. सातव्या वेतन आयोगानुसार वेतन अदा करावयाचे झाल्यास वेतनावरील खर्चात वाढ होईल असा अहवाल विशेष पथकाने सादर केला आहे(सोबत अहवालाची प्रत जोडली आहे.)

या तपासणी अहवालावरून तक्रारीमध्ये तथ्य असल्याचे दिसून येत नाही. सबब सदर तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

आपला विश्वासू

( संदीप संगवे )
विभागीय शिक्षण उपसंचालक,
मुंबई.

प्रत माहितीस्तव सविनय सादर-

१. श्री जितेंद्र कदम, श्री नितीन रमेश दळवी व इतर,
   १३२/बी,२/९, दामोदर हरिदास बिल्डींग, टी. एच. कटारिया मार्ग, माहिम,मुंबई. ४०० ०१६.

२. मुख्याध्यापक/ प्राचार्य, आय.ई.एस. मॉडर्न इंग्लिश स्कुल, दादर, मुंबई-२८.

शिक्षण संचालनालय
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)महाराष्ट्र राज्य,
मध्यवर्ती इमारत, डॉ.ॲनी बेझंट रोड, पुणे ४११ ००१
e-mail : doesecondary1@gmail.com website : www.mahdoesecondary.com
दूरध्वनी: (०२०) २६१२६४६३

गोपनीय:

जा.क्र.शिसंमा/2022/संगवे/तक्रार/आस्था-6/-/2६96
दिनांक:19.04.2022

प्रति,

श्री.नितीन उपासणी,
अध्यक्ष, विभागीय परीक्षा मंडळ/मुंबई विभाग तथा शिक्षण सहसंचालक

**विषयः- श्री.संदिप संगवे,विभागीय शिक्षण उपसंचालक,मुंबई यांचेविरध्द विविध माध्यमातून शिक्षण संचालनालय ( माध्य. व उच्च माध्य.) शिक्षण संचालनालयास प्राप्त तक्रारीबाबत..**

संदर्भ:-१. शासन पत्र तक्रार ३८२२/प्र.क्र.०१/प्रशा-३,दि.१०.०२.२०२२
२. मा.आयुक्त (शिक्षण) यांचे पत्र आस्था अ १०३/मुंबई/तक्रार/मार्च/२०२२/२५२७ दि.१६.०३.२०२२

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, श्री.नितीन रमेश दळवी,मुंबई व श्री.राजाराम जयवंत दळवी , पत्रकार साम टिव्ही, पुढारी यांनी श्री.संदिप संगवे,विभागीय शिक्षण उपसंचालक,मुंबई यांचेविरध्द शासनाकडे व मा.आयुक्त (शिक्षण) कार्यालयालयाकडे तक्रार अर्ज दाखल केले आहेत,सोबत तक्रार यादी (प्रपत्र-'अ') व् तक्रार अर्जासोबतची मूळ कागपत्र अभिलेखे जोडली आहे. याबाबत तक्रारीच्या अनुरोधाने चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश मा.आयुक्त (शिक्षण) कार्यालयाने संदर्भिय पत्रान्वये दिलेले आहेत.

प्रस्तुत प्रकरणी आपणास **"चौकशी अधिकारी"** नियुक्त करण्यात ये आहे. आपण तक्रार अर्जात उपस्थित करण्यात आलेल्या मुददयांची मुददेनिहाय तपासणी करुन त्याबाबतचा वस्तुस्थिती दर्शक अहवाल पुरावापत्रासह व आपले स्वयंस्पष्ट अभिप्रायासह एक महिन्याचे आत संचालनालयास सादर करण्यात यावा.

तसेच चौकशीअंती दोषी आढळणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करुन विभागीय चौकशी नियम पुस्तिका सामान्य प्रशासन विभागाची मार्गदर्शक तत्वे व या विभागाचे दि.७.३.२०१५ चे शासन निर्णयामधील तरतूदीनुसार दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यावर शिस्तभंगविषयक विहित नमुन्यातील विभागीय चौकशीचा प्रस्ताव १ ते ४ जोडपत्रांसह मा.आयुक्त (शिक्षण) कार्यालयास सादर करण्यासाठी या संचालनालयास सादर करण्यात यावा.

MPalkar

(महेश पालकर)
शिक्षण संचालक,
(माध्य.व उच्च माध्य.)
शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत-माहितीस्तव सविनय सादर
मा.आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत पुणे-१ यांचे स्वीय सहायक
मा. शिक्षण संचालक,(माध्य.व उच्च माध्य.)शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे स्वीय सहायक